पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, प्रशासन विभाग,
क्र.प्रशा/१/कावि/ ३२४ /२०२०
दिनांक:- १५ /०३/२०२०

**विषय :- कोरोना विषाणु संसर्गाचा प्रादुर्भाव रोखणे तसेच कोरोना आजारास अटकाव करणेकामी सर्व क्रिडांगणे वापराकरीता बंद ठेवणेबाबत....**

**आदेश,**

मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०५/०३/२०२० रोजी कोरोना विषाणु प्रतिबंधात्मक उपाययोजना संबंधी निर्देश दिलेले आहेत. तसेच यात्रा समारंभ,उत्सव इत्यादीसाठी मोठे जनसमुदाय एकत्रित असणा-या कार्यक्रमास प्रतिबंध करणे किंवा यासारखे कार्यक्रम आयोजित करण्यापासून परावृत्त करणे असे आदेश दिलेले आहेत. सदरचे आदेशाची अंमलबजावणी करणेसाठी मा.विभागिय आयुक्त,पुणे यांनी परिपत्रक क्रमांक नपा/६/कावि/ १००/२०२० दिनांक ०९/०३/२०२० अन्वये कळविले आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कोरोना विषाणु संसर्गाचा धोका निर्माण झाला असून सदर आजाराचा संसर्ग व प्रादुर्भाव रोखणे आवश्यक आहे. तरी कोरोना विषाणु उपाययोजना संबंधी वरीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत,त्यानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका परिसरामध्ये असलेली सर्व क्रिडांगणे,विरंगुळा केंद्र नागरिकांना/लहान मुलांना खेळण्याकरीता तसेच वापर करणेकरीता दिनांक ३१/०३/२०२० पर्यंत बंद ठेवण्यात यावीत व अशा आशयाचे फलक सर्व क्रिडांगणावर,विरंगुळा केंद्रावर लावण्यात यावेत. सदर आदेशाची अंमलबजावणी सर्व क्षेत्रिय अधिकारी व सहाय्यक आयुक्त,क्रिडा यांनी तातडीने करावी.

(संतोष पाटील)
**अतिरिक्त आयुक्त(१),**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी ४११ ०१८**

प्रति,
**१)सर्व संबंधित क्षेत्रिय अधिकारी**
**२)सहाय्यक आयुकत,क्रिडा**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

प्रत-
**सर्व संबंधित विभागप्रमुख**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**